# जपानी पुष्परचना - भाग १६

अगदी छोटे पुष्पपात्र व अगदी एखादे छोटे फूल-पान वापरून पुष्परचना करता येतात. त्यालाच मिनिएचर मुक्तरचना असे म्हणतात. मोठ्या रचनेपेक्षा या इतक्या छोट्या नाजूक रचना करायला जास्त अवघड आहेत. कमी साहित्यातून जास्तीत जास्त कलात्मकता निर्माण करणे थोडे आव्हानत्मक असते. त्यामुळे काही वर्षं पुष्परचना करण्याचा अभ्यास व सराव झाला की या प्रकारच्या रचना शिकविल्या जातात.




या वेळच्या रचना पाहून तुमच्या लक्षात येईल की त्या किती लहान आहेत. त्यांची पुष्पपात्रं खूपच लहान पण आकार सुरेख आहेत. एका रचनेत दोन संगमरवरी पांढरी पुष्पपात्रं आहेत व दुसरी दोन मातीची बनवलेली आहेत. सर्व पुष्पपात्रे खूप लहान असल्यामुळे यात फ्लोरल स्पंज न वापरता फुले

लावली आहेत. नाजूक अॅस्पॅरॅगस, छोट्या दोन रंगी मनी प्लॅन्टची पाने, कृत्रिम पिवळे बॉल्स वापरून रचना केली आहे. प्रत्येक रचनेत दोन पुष्पपात्रे आहेत.




भातुकली मधील छोटी छोटी भांडी अथवा देवघरातील काही छोटी तांब्या-पितळेची भांडी, मातीची छोटी भांडी.... असे काहीही वापरून सुंदर रचना करता येतील. बघा या रचना तुम्हाला आवडतात का? आणि तुमचा अभिप्राय खालील ई-मेल वर अथवा व्हाट्सअॅप नंबर दिला आहे त्यावर जरूर पाठवा.

**सौ. अरुंधती देशपांडे**

व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबा इकेबाना पुणे शाखा

ई-मेल : asdssd@gmail.com

मोबाईल नंबर : 9881043456